● संगीतकार रवी यांनी आपल्या गाण्यांतून भिकाऱ्यांच्या गाण्यांची तसेच मूलपणा जोपासणाऱ्या गाण्यांची मानवलं नाही की काय? ● *हिरा मोतीमध्ये नववास्तववाद असूनदेखील सहाही गाणी लोकसंगीताच्या*

चिराग कहाँ रोशनी कहाँ(१९५९):

नई राहेंबरोबरच रवी यांच्या संगीताने नटलेला देवेंद्र गोयल यांचा *चिराग कहाँ रोशनी कहाँ* हा आणखी एक चित्रपट १९५९ साली पडद्यावर आला होता. राजेंद्रकुमार व मीनाकुमारी या जोडीला एकत्र आणणारा हा पहिला चित्रपट. रवी यांच्याविषयी बोलताना अनेकजण गंमतीने बोलतात की, त्यांनी भिकाऱ्यांच्या गाण्यांची एक परंपरा आपल्या चित्रपट संगीतात निर्माण केली. ही परंपरा निर्माण करताना आपल्या चित्रपट संगीतात त्यांनी एक मूलपणदेखील आणले. १९५६च्या त्यांनी संगीतबद्ध केलेल्या *वचन* या पहिल्याच चित्रपटातील 'चंदा मामा दूर के...' या गाण्यातून. या गाण्यातील हे मूलपणा हेच *चिराग कहाँ रोशनी कहाँ* या चित्रपटातील रवी यांच्या संगीताचे ठळक वैशिष्ट्य होते. *वचन*मधील 'चंदा मामा दूर के...' हे मूलपण जोपासणारं गाणं रवींनी स्वतः लिहिले होते. *चिराग कहाँ रोशनी कहाँ*मधील मूलपण जोपासणारं 'टिम टिम करते तारे यह कहते है सारे...' हे गाणेदेखील रवींनी स्वतःच लिहिले होते. हे गाणे या चित्रपटात दोन भागांत होते. आणि ते लताबाईंनी गायले होते.


'टिम टिम करते तारे...'बरोबरच मूलपण जोपासणारं 'सुन मेरे नन्हे सुन मेरे मुन्ने...', 'चल मेरे घोडे तिक तिक तिक...' हे आणखी एक गाणे या चित्रपटात होते. आणि ते लताबाईंनीच गायले होते. आजची यशस्वी चित्रपट कथा लेखिका हनी इराणी १९५९ मध्ये आपल्या चित्रपटातील एक लोकप्रिय बालतारका होती. ती व तिची बहीण डेझी इराणी यांना डोळ्यासमोर ठेवून अनेक चित्रपट त्या काळात लिहिले जात असत. *चिराग कहाँ रोशनी कहाँ* हनी इराणीला डोळ्यासमोर ठेवून लिहिण्यात आला होता. आणि तिच्यासमोर राजेंद्रकुमार नायक असूनही या चि[illegible] दुय्यम ठरला होता की, एकही गाणे त्याच्या वाट्याला आलेले नव्हते. गायकाच्या आवाजातील 'अजब है मालिक तेरा जहाँ' हे एकच गाणे या चित्रपटात होते. आणि ते रफीने कोरसबरोबर गायले होते. हे गाणे या चित्रपटात पार्श्वगीत म्हणून वापरण्यात आले होते. या एका गाण्याचा अपवाद वगळता या चित्रपटातील अन्य गाणी गायिकेच्या आवाजात होती. 'टिम टिम करते तारे...' या दोन भागाच्या गाण्याबरोबर या चित्रपटातील 'चल मेरे घोडे...', 'बडा बेदर्द जहाँ है यहाँ इन्साफ कहा है...' ही आणखी दोन गाणी लताबाईंनी गायली होती. सुमन कल्याणपूरचा आवाज या चित्रपटातील दोन गाण्यात होता. या दोन गाण्यांपैकी 'अब तो आँख लड चुकी' हे गाणे सुमन कल्याणपूरने एकटीने गायले होते. आणि 'आये हो तो देखले' हे गाणे कोरसबरोबर. 'टिम टिम करते तारे...' हे या चित्रपटातील दोन भागाचे गाणे रवींनी लिहिले असले तरी बाकीची गाणी प्रेम धवनने लिहिली होती. आणि मूलपणामुळे या चित्रपटातील गाणी चांगली लोकप्रियदेखील ठरली होती.

मधु(१९५९):

आजच्या डेव्हीड धवनचं पान गोविंदाशिवाय हलत नाही. चाळीस ते साठ या काळात ग्यान मुखर्जींचं पानदेखील अशोककुमारशिवाय हलायचं नाही. कोणताही चित्रपट निर्माण करताना अशोककुमार त्यांच्या डोळ्यासमोर इतका असायचा की शिवाजी महाराज व टिळक यांच्यावरील चित्रपटाच्या निर्मितीची योजना आखताना आपल्या चित्रपटातील शिवाजी व टिळक म्हणूनदेखील अशोककुमारच्या नावाचा त्यांनी अग्रक्रमाने विचार केला होता. शिवाजी व टिळक म्हणूनदेखील अशोककुमारचा चेहराच त्यांच्या डोळ्यासमोर यावा इतके त्यांचे अशोककुमार - प्रेम आंधळे होते. यामुळेच १९४१च्या *झुला* या आपल्या पहिल्या चित्रपटापासून ते १९५६च्या *शतरंज* या शेवटच्या चित्रपटापर्यंत त्यांनी अशोककुमारलाच घेऊन एकजात सारे चित्रपट निर्माण केले. *शतरंज* निर्मिती अवस्थेत असतानाच त्यांनी अशोककुमारशिवाय एक चित्रपट सुरू केला होता. *मधु*, *शतरंज*ची नायिका मीनाकुमारी हिला करण दिवाणबरोबर नायिका बनवून पण अशोककुमारला उणे करून निर्माण होत असलेला हा चित्रपट त्यांच्या प्रकृतीला मानवला नाही की काय कोण जाणे. हा चित्रपट अर्धवट अवस्थेत असतानाच त्यांचे निधन झाले. त्यांच्या नंतर त्यांचे सहाय्यक एस. बॅनर्जी यांनी हा चित्रपट पूर्ण केला. पण एका दिग्दर्शकाच्या निधनानंतर दुसरा दिग्दर्शक कोणताही चित्रपट जेव्हा पूर्ण करतो तेव्हा त्या चित्रपटात एक रखडलेपण येतं. *मधु*त हे रखडलेपण आले होते. त्यामुळे हा चित्रपट केव्हा आला न् केव्हा गेला हे कोणाला कळलेच नाही. तरीदेखील अनेकांना आजदेखील हा चित्रपट आठवतो तो या चित्रपटातील रोशन यांच्या सुश्राव्य संगीतासाठी. 'बता दो कोई कौन गली गए शाम...' या भजनासाठी. हे भजन या चित्रपटात



चिराग कहाँ रोशनी कहाँमध्ये



गीतकार रवी

दोन भागात होते. एक भाग मन्ना डेने गायला होता. तर दुसरा भाग लताबाईंनी.

रफीचा आवाज या चित्रपटातील दोन द्वंद्व गीतात होता. 'तुमसे लगन लगी...' हे द्वंद्वगीत आशाबाईंच्याबरोबर. 'काहे बनोजी अंजान', 'किसी को न बताऊंगी हो..' व 'पानी चुनर गोरी हाय रे..' ही या चित्रपटातील तीन गाणी लताबाईंच्या एकटीच्या आवाजात होती.

पन्नास-साठच्या दशकात आपल्या चित्रपटातील नायिका काखेत कळशी घेऊन पाणी भरायला जाताना अनेकदा गाताना दिसायची. *मधु*तील मीनाकुमारीची नायिका काखेत कळशी घेऊन गाणारी एक नायिका होती. शैलेंद्र, नक्श लायलपुरी, प्रेम धवन या चित्रपटाचे गीतकार होते.


हीरा मोती(१९५९):

*मधु*मधील रोशन यांच्या संगीताचा बाज

परंपरा *चिराग कहाँ रोशनी कहाँ*तही जपली. ● ग्यान मुखर्जीचे अशोककुमारवरील आंधळे प्रेम *मधुत* त्यांना बाजात फुललेली होती. ● *सी. आय. डी. गर्ल*साठी रोशनने आपल्या संगीताचा नेहमीचा बाज बदलला.

□ इसाक मुजावर

लोकसंगीताचा होता. हाच बाज घेऊन रोशननी १९५९ साली *हीरा मोती* हा आणखी एक चित्रपट लोकसंगीताच्या रंगातच फुलवला होता. १९५२च्या बिमल रॉय यांच्या *दो बिघा जमीन* या चित्रपटाने नववास्तववादाचे एक वारे आपल्या चित्रपटात आणले होते. *हीरा मोती* या नववास्तववादाचा पुरस्कार करणारा ग्रामीण पार्श्वभूमीवरील एक चित्रपट होता. कृष्ण चोप्रा या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. त्यांनी दिग्दर्शित केलेला हा पहिलाच चित्रपट होता. आणि तो मुन्शी प्रेमचंद यांच्या *दो बैलों की कहानी* या कथेवरून तयार करण्यात आला होता. बलराज सहानी व निरूपा राय ही *दो बिघा जमीन*ची जोडी या चित्रपटात शेतकरी दाम्पत्याच्या भूमिकेत चमकली होती.



ग्यान मुखर्जी

या चित्रपटातील एकजात साऱ्या गाण्यांचा बाज लोकसंगीताचा असला तरी लोक गीतातून जन्माला आलेले 'कौन रंग मुंगवा' हे गाणे या चित्रपटाचे सर्वात मोठे आकर्षण होते. प्रेम धवननी उत्तर प्रदेशातील एका लोकगीताचा मुखडा घेऊनच हे गाणे लिहिले होते. लोकगीताचा आधार घेऊन प्रेम धवननी या चित्रपटातील आणखी एक गाणे लिहिले होते. 'तू दुनिया में सर' संगीतकार गुलाम महंमद यांच्याबरोबर गुलाम महंमद नावाचा एक गायकदेखील तेव्हा आपल्या चित्रपटात होता. हे गाणे या चित्रपटात त्याने कोरसबरोबर गायले होते. सुधा मल्होत्रा व सुमन कल्याणपूर यांच्याबरोबर आशा भोसले व उषा मंगेशकर या दोघींनी गायलेले एक गाणेदेखील या चित्रपटात होते. या गाण्याचे बोल होते 'घर के जोगी का भैस' लता मंगेशकर यांचा आवाज या चित्रपटातील तीन गाण्यात होता. या तीन गाण्यांपैकी 'नाच रे धरती के प्यारे' हे गाणे लताबाईंनी हेमंतकुमार व कोरसबरोबर गायले होते. 'ओ बेदर्दी आ मिल' हे गाणे कोरस-बरोबर तर 'एक दिन थे आँसू' हे गाणे एकटीने.

'तू दुनिया में सर को' व 'कौन रंग मुंगवा...' ही या चित्रपटातील दोन गाणी प्रेम धवननी लिहिली असली तरी या चित्रपटातील बाकीची गाणी मात्र *दो बिघा जमीन*ची गाणी लिहिणाऱ्या शैलेंद्रनीच लिहिली होती. *दो बिघा जमीन*मध्ये नववास्तववादाचा पुरस्कार करताना बिमल रॉयने अवघी चार गाणी ठेवली होती. पण कृष्ण चोप्रांनी मात्र *हीरा मोती*त नववास्तववादाचा पुरस्कार करताना गाण्यांची संख्या कमी केली नव्हती. चांगली सहा गाणी या चित्रपटात त्यांनी ठेवली होती. *दो बिधा जमीन*ला बिमल रॉयनी लोकप्रिय नृत्यतारकांच्या नृत्यापासून दूर ठेवले होते. पण कृष्ण चोप्रांनी *हीरा मोती*त कक्कू व हेलन या दोघींच्या नृत्याचा समावेश केला होता. हा चित्रपट पडद्यावर आला तेव्हा *छोटी बहन*मुळे मेहमूद-शुभा खोटे यांची जोडी एक विनोदी जोडी म्हणून आकाराला आली होती. पण *हीरा मोती*तील शुभा खोटेची भूमिका काही विनोदी नव्हती. ती या चित्रपटात अशोककुमारची नायिका बनली होती. आणि 'ओ बेदर्दी आ मिल जल्दी...'सारखी आर्त गाणी या चित्रपटात तिच्या तोंडी होती.

सी. आय. डी. गर्ल (१९५९):

मधु, *हीरा मोती*बरोबरच रोशननी संगीतबद्ध केलेला १९५९चा आणखी एक ठळक चित्रपट म्हणजे *सी. आय. डी. गर्ल*, रवींद्र देवे या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. १९४५च्या *धमकी* या चित्रपटापासून रवींद्र देवेनी येथे आपल्या रहस्यमय चित्रपटांची एक परंपरा निर्माण केली होती. *सी. आय. डी. गर्ल* त्यांच्या या परंपरेतलीच एक रहस्यमय चित्रपट होता. आणि ही गोष्ट ओळखूनच रोशनला आपल्या संगीताचा नेहमीचा बाज या चित्रपटात बदलावा लागला होता. यापूर्वी १९५७ साली रवींद्र देवे यांचा *आग्रा रोड* हा रहस्यमय चित्रपट संगीतबद्ध करतानादेखील रोशननी आपला नेहमीचा संगीताचा बाज बदलला होता. 'हम से रिप्पी टिप्पी हो गई...' व 'ओ मिस्टर सुनो' या गाण्यात पाश्चिमात्य संगीताची कास धरून पण *सी. आय. डी. गर्ल*मध्ये मात्र त्यांना पाश्चिमात्य संगीताची कास धरली नव्हती. उडत्या पंजाबी संगीताची कास धरली होती. 'लोरे झूठ नही, लूट नही,' हे काहीसे पंजाबी बोल असलेले पंजाबी संगीतातील एक गाणे या चित्रपटात होते. आणि रफी व आशा यांनी गायलेल्या या गाण्यावर बलराज सहानी गीताबालीबरोबर पडद्यावर नाचले होते. हे या गाण्याचे एक ठळक वैशिष्ट्य होते. 'कर प्यार या चल तू थाने,' हे या चित्रपटातील आणखी एक गाणे पंजाबी संगीताच्या वळणाने जाणारे होते.

दूरदर्शनवरील अनेक मालिकांत अभिनेता सुबीराजला आज तुम्ही चरित्र भूमिकात पाहता. हा सुबीराज नायक बनायला चित्रपटात आला होता. १९५९ चा *सी. आय. डी. गर्ल* त्याची भूमिका असलेला पहिला चित्रपट. या चित्रपटात त्याने बलराज सहानींच्या छोट्या भावाची व गीताबालीच्या दिराची भूमिका केली होती. तो व गीताबाली यांच्यावर या चित्रपटात एक गाणे चित्रित करण्यात आले होते. 'बडी बुलंद मेरी भाभी की' हे गाणे या चित्रपटाचे सर्वात मोठे आकर्षण ठरले होते. १९५८च्या *घर संसार* या चित्रपटात दीर व भावजय यांचे आशा भोसलेंनी गायलेले 'भाभी करे अपील और' हे नर्गीस व राजेंद्रकुमार यांच्यावर चित्रित करण्यात आलेले गाणे चांगलेच लोकप्रिय ठरले होते. या गाण्या-पासूनच प्रेरणा घेऊन *सी. आय. डी. गर्ल*मधील 'बडी बुलंद मेरी भाभी' हे आशा व रफी यांनी गायलेले गाणे तयार करण्यात आले होते. आणि ते चांगलं लोकप्रियदेखील ठरलं होतं.

रफीबरोबर दोन गाणी गात असताना आशाबाईंनी या चित्रपटातील 'दर्दे दिल जरा जरा...' हे नृत्यगीत, सुधा मल्होत्राबरोबर गायिले होते. तर 'अँखियो में दिल खोया,', 'इक बात सुन मतवाले,' व 'जिंदगी से नाता तोड' ही तीन गाणी एकटीने या चित्रपटातील 'बडी बुलंद मेरी भाभी की पसंद...', 'दर्दे दिल जरा जरा...', 'जिंदगी से नाता तोड के...', 'लोरे झुठ नही, लूट नही...' ही गाणी आनंद बक्षींनी लिहिली होती. बाकीची हसरतनी.●